**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उद्योग मंत्री** : पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **वस्त्रोद्योग मंत्री** : महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : सार्वजनिक उपक्रम समितीचा बारावा व तेरावा अहवाल सादर करणे.**

**चार : अनुसूचित जाती कल्याण समितीचा सातवा अहवाल सादर करणे.**

**पाच : मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव -**

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) सन्माननीय विधानसभा सदस्या श्रीमती दिपीका संजय चव्हाण यांनी श्री.सुनिल सैंदाणे, तहसिलदार, बागलाण, जि.नाशिक यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(२) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. राजेश क्षीरसागर यांनी श्रीमती ज्योतीप्रिया सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना व श्रीमती वैशाली माने, पोलीस उप अधीक्षक, यांच्याविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **सर्वश्री. सुरेश हाळवणकर, सुनिल शिंदे, संतोष दानवे वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील सर्वच क्षेत्रातील कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी योजना राबविणारे मंडळ स्थापन करण्याऐवजी सर्वच असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी एकच कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, त्यामध्ये यंत्रमाग कामगार, शेतमजूर, पत्रकार व वृत्तपत्र विक्रेते, रिक्षाचालक, ट्रकचालक, वाहनचालक आदी घटकांचा समावेश असणे, या सर्व घटकांच्या उत्पन्नावर सेस लावून उत्पन्नाचे साधन निर्माण करणे सुध्दा शासनाच्या विचाराधीन असणे, सदर घटकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी, आरोग्य सुविधा, विमा यासारख्या कोणत्याही कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत नसणे, परिणामी हे घटक आर्थिकदृष्टया अप्रगत राहून सामाजिक विषमता निर्माण होणे, याबाबत मा. अर्थमंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीत राज्यातील सर्वच क्षेत्रातील कामगांरासाठी एकच कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे सदरचे कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. अशोक पाटील, अमीत साटम, प्रकाश फातर्पेकर, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, मो. आरिफ (नसीम) खान, अमिन पटेल वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईत सन २०१० ते २०१६ या कालावधीत विविध विकास कामासाठी सुमारे २५ हजार वृक्ष तोडण्यास माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये मंबई महापालिकेकडून दिलेली संमती, मुंबई शहर व उपनगरात मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाकडून झाडांचे संरक्षण करण्याऐवजी दर महिना किमान ५०० झाडे तोडण्याची परवानगी देण्यात आल्यामुळे पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, नाहूर गाव (मुंबई) पश्चिम येथे मे.पिरॅमल रिअल्टी या विकासकास इमारतींच्या बांधकामासाठी अशोक, पिंपळ, जंगली चेरी, आंबा, खजूर, नारळ, सूबाभूळ, चिंच, चाफा, कडूलिंब, आवळा, बोर व उंबर आदी २३८ झाडे तोडून ती पुनर्रोपीत करण्यास परवानगी देतांना महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाकडून झाडे कापण्याच्या बदल्यात ३० दिवसात नवीन झाडे लावण्याचे प्रतिज्ञापत्र विकासकाकडून घेण्यात येऊनही विकासकाने त्याची अंमलबजावणी न करणे, याबाबत तक्रार करुनही वृक्ष

प्राधिकरणाने त्याकडे केलेले दुर्लक्ष, वृक्षतोडीस परवानगी देतांना दुपटीहून अधिक झाडांना पुनर्रोपित करण्याची पालिकेने अट घातली असतांनाही या झाडांचे नेमके काय झाले, पुनर्रोपित कुठे आणि कसे केले जाते याबाबत गत पाच वर्षात कोणताच आराखडा व माहिती महापालिकेकडे उपलब्ध नसणे, परिणामी वृक्ष प्राधिकरणातील अधिकारी व विकासक यांच्यात आर्थिक संगनमत असल्याचा निर्माण झालेला संशय, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याप्रकरणी महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरणातील अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करुन मे.पिरॅमल रिअल्टी या कंपनीस झाडे कापण्याची देण्यात आलेली परवानगी रद्द करुन वृक्षतोड व वृक्ष पुनर्रोपण याबाबत नियमांची व कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

(३) **श्री नरेंद्र पवार, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. अमिन पटेल, संतोष दानवे वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास येणे, महापालिका क्षेत्रातील कचऱ्याचे संकलन, वाहतूक आणि विल्हेवाट याबाबत राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती नगोरोत्थान योजनेंतर्गत ४४ कोटी रुपयांचे विशेष अनुदान देण्याचे मान्य करून या योजनेत सहभागी होण्यासाठी महापालिकेला अर्धा हिस्सा भरावा लागणे, त्यानुसार महापालिकेने उंबर्डे कल्याण (प) येथे सुमारे १० हेक्टर क्षेत्रात २७ कोटी खर्च करून कंपोस्ट खत आणि वीजनिर्मिती प्रकल्प सुरु करणे, मात्र सदर प्रकल्प पूर्णत्वास नेण्यास प्रशासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी या प्रकल्पाचे २७ कोटी रुपये वाया जाणे, शासनाने मुंबई प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत येणाऱ्या महापालिकांच्या घनकचऱ्याच्या विघटनासाठी तळोजा येथे विघटन प्रकल्प राबविण्याचे निश्चीत करणे, परंतु सदर प्रकल्पात सहभागी होण्यास पालिकेने शासनास दिलेला नकार, उंबर्डे येथे प्रकल्प राबविण्यासाठी पुन्हा सुमारे ६० कोटीचा प्रारूप विकास आराखड्याचा शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सात : सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (चौथा व शेवटचा दिवस).**

(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

(३) सार्वजनिक आरोग्य विभाग.

(४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

(५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

(६) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[ चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ५.३० वाजता ]**

**(बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

आठ : **सर्वश्री. सुनिल प्रभु, राज पुरोहित, सदा सरवणकर, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. अजय चौधरी, सुनिल शिंदे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. रमेश लटके, योगेश सागर, तुकाराम काते, मंगेश कुडाळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. अमीत साटम, अशोक पाटील, अतुल भातखळकर, सुनिल राऊत, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. प्रकाश सुर्वे, मंगलप्रभात लोढा, प्रकाश फातर्पेकर, सरदार तारासिंह, संजय पोतनीस, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.संजय केळकर, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव ( चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर ) :-**

"मुंबई शहरात असलेल्या १६ हजार जुन्या उपकर प्राप्त इमारतींमध्ये ४ लाखांपेक्षा जास्त कुटुंबिय राहत असणे, त्यापैकी गेल्या ४० वर्षाच्या कालावधीत केवळ ६७२ इमारतींचा पुर्नविकास झालेला असणे, १५०० इमारती जमिनदोस्त करून तेथील सुमारे २१ हजारांपेक्षा जास्त कुटुंबिय संक्रमण शिबिरात गत १५ ते २० वर्षापासून राहत असणे, विकासकांनी पर्यायी निवासाचे मान्य केलेले भाडे व अनेक वर्षापासून थकविलेले भाडे देण्याची आवश्यकता, जुन्या इमारतीमध्ये राहणाऱ्या लाखो रहिवाश्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करणे, राज्य शासनाचे गृहनिर्माण धोरण राबविण्यामध्ये विकासकांकडून सहकार्य न मिळणे, मुंबईतील बी.पी.टी., रेल्वे इत्यादीच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांसाठी राबविण्यात आलेल्या एसआरए गृहनिर्माण प्रकल्पांची झालेली दूरवस्था, १०० वर्षाहून जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीच्या भाडेकराराचे नुतनीकरण न झाल्यामुळे त्या इमारतीचा पुर्नविकास खोळंबला असणे व परिणामी तेथील रहिवाश्यांचे जीव धोक्यात येणे, मुंबईतील वरळी भागातील झोपडपट्टी पुनर्विकासाचे अनेक प्रलंबित प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांच्या मालकीच्या जागांवर गिरणी कामगारांना घरे बांधून देण्याच्या योजनेला गती देणे, बोरीवली संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करून अतिक्रमणांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मा.मुख्यमंत्री, मा.वनमंत्री, मा.गृहनिर्माण मंत्री, मा.वन राज्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

नऊ : **सर्वश्री. जयंत पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. शशिकांत शिंदे, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, प्रा. विरेंद जगताप, सर्वश्री. संदीप नाईक, सुनिल केदार, राजेश टोपे, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, मो. आरिफ नसीम खान, सर्वश्री. सुरेश लाड, अमित देशमुख, हसन मुश्रीफ, डी. एस. अहिरे, श्रीमती दिपीका चव्हाण, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. मधुकरराव चव्हाण, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, हनुमंत डोळस, नितेश राणे, बसवराज पाटील, वसंतराव चव्हाण, अमीन पटेल, के. सी. पाडवी, काशिराम पावरा, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती अमिता चव्हाण, श्री. शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

" राज्यात आज विजेचा प्रश्न गंभीर झालेला असणे, भारनियमन, शाश्वत वीज न मिळणे, विद्युत कंपनीत वाढत चालत असलेली महसुली तूट, अशा अडचणींना सामोरे जावे लागत असणे, राज्यातील ८० टक्के जनतेला दररोज सुमारे ४ तासांहून अधिक भारनियमन सोसावे लागणे, भारनियमनामुळे शेती, उद्योग व गावांतील बरेचसे छोटे उद्योजक अडचणीत आले असणे, वीज वितरण कंपनीच्या प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्याने विद्युत प्रकल्पांना अव्यावसायिक पध्दतीने नुकसानीत चालवित असणे, वीज निर्मिती केंद्रांना कोळशाचा अनियमित पुरवठा, पाण्याची टंचाई, वीज निर्मितीचे संच जुने झाले असून जुन्या संचाना चालविण्यासाठी बराच खर्च करावा लागत असणे, त्याऐवजी आधुनिक तंत्रज्ञान वापरुन संचाचे नुतनीकरण करणे किंवा नवीन संच बसविण्याची आवश्यकता, रत्नागिरी जिल्हयातील दाभोळ वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु करण्यास शासनास आलेले अपयश, शासनाने या प्रकल्पातून अंग काढून घेतल्यामुळे शासनाला झालेले आर्थिक नुकसान, राज्यात ५० लाख सोलार पंप बसविण्याची शासनाने घोषणा करुन सुध्दा अजूनही सोलार पंप बसविण्यात येत असलेल्या अडचणी, मुंबई शहरास विद्युत पुरवठा करणाऱ्या बेस्ट, टाटा पॉवर कंपनी व रिलायन्स एनर्जी या तिन्हीही कंपन्यांनी विजेचे दर समान ठेवण्याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव सादर करावा असे शासनाने जाहिर करणे, राज्यातील अडचणीत आलेल्या यंत्रमाग उद्योगाकरिता वेगळी वर्गवारी निर्माण करण्याची गरज असून या उद्योगाला अनुदान देण्याची आवश्यकता, राज्यात वीजेची गळती व चोरी होण्याचे प्रमाण अधिक असणे, वीज वितरणातील गळती सरासरी १६ टक्के असणे, औष्णिक विद्युत केंद्राना मिळणारा आयातीत

कोळसा दिलेल्या निकषानुसार मिळत नसणे, इंधन पुरवठा करारानुसार कोळशांची संयुक्त नमुना तपासणी केवळ कोळसा पुरवठयाच्या ठिकाणी होत असणे, जो दर्जा घोषित केला जातो त्यानुसार प्रत्यक्षात औष्णिक विद्युत केंद्रांना त्या दर्जाचा कोळसा प्राप्त होत नसणे, कोळसा खरेदीमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, ग्राहकांच्या वीज बिलात होणाऱ्या गफलती, अणुविद्युत ऊर्जेचा शासनाने ३ टक्के इतका अल्प उपयोग करुन घेतलेला असणे, राज्यातील बरेच जलविद्युत प्रकल्प पाण्याअभावी बंद पडलेले असणे, यात सर्वाधिक प्रकल्प बीड जिल्हयातील असणे, बंद असलेले विद्युत प्रकल्प सुरु करुन आवश्यक वीज निर्मिती करण्याबाबत तसेच वीज कंपन्यांमध्ये सुरु असलेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार रोखण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

**दहा : शासकीय विधेयके :**

**(१) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१७.

---

**(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक १७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक २७ मार्च, २०१७ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. १ व २)**

(१) **श्री. क्षितीज ठाकूर, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"पालघर जिल्हयाची पश्चिम किनारपट्टी निसर्ग सौंदर्याने नटलेली असून तेथे चिंचणी किनारा, वाढवण किनारा, डहाणू समुद्रकिनारा, नरपड बीच, आगर, चिखला आणि बोर्डी बीच तसेच ऐतिहासिक डहाणू किल्ला या वास्तू पर्यटकांना आकर्षित करीत असणे, येथील प्रसिध्द महालक्ष्मी मंदिर, आशागडचे संतोषी माता मंदिर, याबरोबर बोर्डीचा बारडाचा गड, गंभीर गड, भीम बांध या ऐतिहासिक सांस्कृतिक स्थळांना भाविक आणि पर्यटक मोठया प्रमाणात भेटी देत असणे, येथील किनाऱ्यावरील हिरवीगार वनराई, लहान मोठी झाडे आणि येथील समुद्राचे व सुरुच्या वनांचे दर्शन खरेच नयनरम्य असून समुद्र किनारा पर्यटकांचे लक्ष वेधून घेत असतांनाही डहाणू तालुक्यातील या पर्यटन स्थळांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे येथील पर्यटन व्यवसायाला चालना मिळत नसणे, येथील पर्यटनाला चालना मिळून स्थानिकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. राजेश काशीवार, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"झरी उपसा सिंचन प्रकल्पास (ता अर्जुनी मोरगांव, जि. गोंदिया) सन २००५ साली मान्यता प्राप्त झाली असून भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदूर व गोंदिया जिल्ह्यातील मोरगांव अर्जुनी तालुक्यातील १८ गावांना त्याचा लाभ मिळणार असणे, या योजनेकरीता २२७५ हेक्टर लागवडी क्षेत्र आवश्यक असून हे क्षेत्र धापेवाडा टप्पा -२ अंतर्गत येत असल्यामुळे या योजनेचे लाभक्षेत्र धापेवाडा टप्पा-२ किंवा झरी उपसा सिंचन योजना यापैकी कोणत्या योजनेत समाविष्ट करावयाचे याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मंडळ कार्यालयाकडून कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा (जि. गोंदिया) यांना देण्यात येणे, परंतु त्यावर अद्यापही कोणती कार्यवाही करण्यात आली नसणे, सदर प्रकल्प कित्येक वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी लागवडी योग्य क्षेत्र ओलिताखाली आणण्याच्या दृष्टीने झरी प्रकल्प तातडीने पुर्णत्वास आणण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २९ मार्च, २०१७

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.